**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra,India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/ 119/ 115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ एबीएम/ २०२३-२४/ 15958-61 दिनांक:- २६-१०-२०२३

प्रति,
**प्राचार्य / प्राचार्या,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:-** **शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ व सॅटेलाईट केंद्र इत्यादीबाबीसाठी विद्यापीठास विहित मुदतीच्या आत प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे पत्र दिनांक २५-१०-२०२३.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र अध्यादेश क्र. १३ दिनांक २०-१०-२०२३.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता संदर्भिय क्र. (१) व (२) अन्वये नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ व सॅटेलाईट केंद्रासाठी दि. १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत नियामामध्ये विहित केलेल्या प्रारुप / नमुन्यामध्ये ऑनलाईनद्वारे सुधारित अध्यादेश-१५१ व १५२ अन्वये विहित केलेल्या शुल्काचा ऑनलाईनद्वारे भरणा करुन विहित नमुन्यातील फॉर्मसुध्दा दि. १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत ऑनलाईनद्वारे विद्यापीठास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी विहित नमुन्यातील अर्ज व विहित शुल्काचे चलन व पुरक दस्ताऐवजासह दि. २० नोव्हेंबर, २०२३ पर्यंत हार्डकॉपी विद्यापीठ कार्यालयाचे शैक्षणिक विभागास सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दिनांकानंतर कोणतेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

**कुलसचिव**

प्रतिलीपी:-

१. संचालक, युनिक विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवून सुचित करण्यात येते की, नवीन महाविद्यालय व विस्तारीकरणाअंतर्गत येणारे प्रस्ताव संबंधित महाविद्यालयासाठी विहित असलेल्या प्रकियेप्रमाणे वेबसाईट तात्काळ आजपासून दि. १५ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत सुरु ठेवण्यात यावी.
२. वित्त व लेखा अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहिस्तव.

स्वा–
**कुलसचिव**

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

# शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रस्तावित नविन महाविद्यालय / परिसंस्थांसाठी प्रस्ताव सादर करणे संदर्भात निर्देश / सुचना :

१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र दि. २२ सप्टेंबर, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता नवीन महाविद्यालय / नवीन परिसंस्था साठी स्थळ बिंदुना मान्यता देण्यात आलेली असून त्याची प्रत या सोबत जोडलेली आहे. त्यांनुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ ३ (क) व शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदींनूसार सर्व बाबींची पुर्तता करणा-या संस्थाकडून नवीन महाविद्यालय / परिसंस्था यासाठी **दि. १५ नोव्हेंबर, २०२३** पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची हार्डकॉपी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात **दि. २० नोव्हेंबर, २०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रस्तुत प्रकरणी **अध्यादेश-१५१, १५२ व १५२A अन्वये** विहित केल्यानुसार सर्व संबंधित संस्था / महाविद्यालयांनी शुल्काचा भरणा ऑनलाईन करणे आवश्यक आहे व विहित केलेल्या प्रक्रियेनुसार चलन प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

३) नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी शासन निर्णय क्र.एनजीसी २०१७/(२९/१७)मशि-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ नुसार शासनाने विहित केलेल्या **परिशिष्ठ ``अ``** मध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक असून शासन निर्णयामध्ये नमुद कार्यपध्दतीनूसार व परिशिष्ट **`ब`** मध्ये विहित केल्याप्रमाणे जसे की, महानगरपालिका क्षेत्रामध्ये अद्ययावत इमारत व संपूर्ण भौतिक सुविधेसह अर्धा एकर महाविद्यालयाची जागा असणे आवश्यक आहे. नगरपालिका क्षेत्राअंतर्गत एक एकर व ग्रामपंचायत / ग्रामीण क्षेत्रासाठी तीन एकर जमिनीबाबत संस्थेच्या स्वत:च्या मालकीची किंवा अधिकृत रजिस्टर भाडेपट्टा ई. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. सविस्तर माहिती दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे आहे. सदर शासन निर्णय सोबत जोडलेला आहे त्यातील सर्व अटी व शर्तींची पुर्तता करणा-या व शासन पत्र दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ मध्ये दर्शविलेल्या स्थळ बिंदुसाठीच नवीन महाविद्यालय / परिसंस्थाचे प्रस्ताव सादर करावेत.

४) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या प्रस्तावासोबत **पारंपारिक महाविद्यालयासाठी रुपये ७ लाख व विधी महाविद्यालयासाठी रुपये १५ लाखाचे राष्ट्रीयकृत शेडयूल बँकेमध्ये किमान पाच वर्षासाठी विद्यापीठ व संस्थेच्या नावे संयुक्त मुदत ठेव (एफ.डी.) प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

५) मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयानुसार एकाच संस्थेचे विविध महाविद्यालय किंवा एकापेक्षा जास्त नविन प्रस्तावित महाविद्यालयासाठी संस्थेने अर्ज केल्यास शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ मधील तरतुदीनुसार व **मुद्दा क्र. (४) अन्वये**